# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०२/०५/२०२६ (शनिवार )

---

## १०५.१ किलोग्रॅम गांजा आणि गांजा वाहतुक करणारे वाहनासह ६१ लाख १२ हजारांचा मुद्देमाल जप्त
## वडोदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा** :— दिनांक ०२/०५/२०२६ रोजी वडोदा पोलीसांना रात्री विभागिय गस्त दरम्यान **उमरी फाटा येथुन २०० मिटर पुढे रोडच्या कडेला ट्रक क्र. एम एच ४० बी एल ४४४५ उभा दिसला**. पोलीसांना नमुद वाहन संशयीत वाटल्याने पोलीसांनी शासकीय पोलीस वाहन थांबविले असता **ट्रक क्र. एम एच ४० बी एल ४४४५ चा चालक पोलीसांना पाहुन ट्रक मधुन उडी मारून अंधराचा फायदा घेत पळुन गेला.** पोलीसांनी ट्रकच्या कॅबीनची पाहणी केली असता त्यात खाकी रंगाच्या टेपने पॅक केलेले दोन पॅकेट दिसले. नमुद पॅकेटाचा उग्र वास येत असल्याने नमुद पॅकेट गांजाचे असल्याबाबत त्यांना संशय आला. पोलीस पथकाने मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकार, कन्हान उपविभाग यांना सदर माहीती देवुन वरीष्ठ अधिकारी यांच्या **मार्गदर्शनात ट्रक क्र. एम एच ४० बी एल ४४४५ च्या डाल्यात चढुन पंचासमक्ष झडती घेतली असता वेगवेगळया प्लास्टिक चुंगडयांमध्ये हिरवा काळपट रंगाचा पाने फुले,**

बिया, कळी, देड, बोंडे असलेला एकुण वजन १०५.१ किलोग्रॅम गांजा अंमली पदार्थ मिळुन आला.

पोलीसांनी पंचासमक्ष १०५.१ किलोग्रॅम गांजा एकुण किंमत २१,०२,०००/— रूपये , ट्रक क्र. एम एच ४० बी एल ४४४५ किंमत ४०,००,०००/— रूपये आणि दोन मोबाईल किंमत १०,०००/— रूपये असा एकुण किंमती ६१,१२,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन वडोदा येथे कलम ८ (क), २०(ब) (ii) (सी) एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. साखळी पुरावे जोडुन नागपुर ग्रामीण पोलीस सदर गुन्हयाचा तपास करीत आहेत.






**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## नागपूर ग्रामीण पोलिसांनी अवैधरित्या रेतीची टोळीने चोरटी वाहतुक करून शासनाचा महसुल बुडवुन फसवणुक करणाऱ्या ९ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये कारवाई केली आहे.

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— मा.श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात भिवापुर पोलीसांनी **बनावट परवाना तयार करून अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करून शासनाचा महसुल बडवुन फसवणुक करणारा** टोळी प्रमुख तसेच ८ टोळी सदस्य अशा एकुण ९ आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ लावला आहे. सदर टोळीचा प्रमुख आरोपी नामे **टोळीप्रमुख नामे १) मोहम्मद ईनाजूल उर्फ कल्लू तजमुल खॉन,वय ४० वर्ष,रा. रोशनबाग खरबी चौक,नागपूर आणि टोळी सदस्य २) कैसर अली रियाजुददीन अली,वय ४७ वर्ष,रा. गरीब नवाज चौक, खरबी, नागपूर ३) सुरज दिलीप गभने,वय २७ वर्षे, रा.गुडेगाव, पो.सावरला, ता.पवनी जि.भंडारा, ४) दिनेश मधूकर**

**काकडे, वय ३२ वर्षे,रा. डोंगरगाव ता. कुही जि. नागपूर आणि ५ पाहीजे आरोपी हे आहेत.**

दिनांक २४/०४/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण च्या पथकाने अवैधरित्या रेती वाहतुक करणारा एक भारत बेंझ कंपनीचा १२ चक्का टिप्पर एम एच ४९ बी झेड १७१७ आणि त्याला स्कॉटींग करून पोलीस आणि महसुल विभाग यांच्या पासुन सतर्क करणारी हुडई क्रेटा क्र एम एच ४९ सी डी ४५७७ या वाहनांना थांबवुन टिप्पर वाहन चालक आरोपी क्रं **१) कैसर अली रियाजउद्दीन अली, वय ४७ वर्षे, रा. गरीब नवाज चौक, खरबी नागपुर आणि हुडई क्रेटा चालक आरोपी क्रं २) मोहम्मद ईनाजुल उर्फ कल्लू खान, वय ३८ वर्षे, रा. रोशन बाग, खरबी, नागपुर यांना ताब्यात घेतले.** नमुद आरोपींनी रेती वाहतुकीचा बनावट परवाना बनवुन शासनाचा महसुल बुडवुन शासनाची फसवणुक केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपींविरूध्द पोलीस स्टेशन भिवापुर येथे कलम ३०३ (२), ३१८(४),३३६(३),४९,३(५) भा न्या सं सहकलम ४८ (७) ४८ (८) महा जमीन महसुल संहित १९६६ सह ४, २१ खान व खनीज अधीनियम १९५७ सह कलम ३ सार्वजनीक संपत्ती नुकसान प्रती अधी १९८४ सह १५ पर्यावरण संरक्षण अधी अन्वये गुन्हा नोद करण्यात आला. **तपासादरम्यान टोळी सदस्य आरोपी क्रं ३) सुरज दिलीप गभने, वय २७ वर्षे,रा.गुडेगाव, पो. सावरला, ता. पवनी जि. भंडारा आणि आरोपी क्रं ४) दिनेश मधूकर काकडे, वय ३२ वर्षे, रा. डोंगरगाव ता. कुही जि. नागपूर यांना पोलीसांनी अटक केली.** पोलीसांनी नमुद आरोपींचा **७ दिवस पोलीस कोठडी रिमांड** प्राप्त करून आरोपींकडे कौशल्यपुर्ण विचारपुस करून तसेच तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्हयाचा सखोल तपास केला.


सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान असे निदर्शनास आले की,सदर गुन्हा हा संघटीतरित्या केलेला असुन नमुद संघटित गुन्हेगारी टोळीचा प्रमुख मोहम्मद ईनाजूल उर्फ कल्लू तजमुल खॉन, हा आहे. टोळी प्रमुख हा त्याचे साथीदारांसह सातत्याने रेती चोरीचे गुन्हे करत आलेला आहे. अवैध रेती चोरीचे गुन्हे करून नमुद आरोपी हे शासनाचा महसुल बुडवुन शासनाचे आर्थिक नुकसान करतात तसेच पर्यावरणाला नुकसान पोहचवतात. नमुद टोळीने रेती वाहतुकीचा बनावट परवाना तयार करून शासनाची फसवणुक केलेली आहे. नमुद टोळी प्रमुख आणि टोळी सदस्य यांचेवर पोलीस स्टेशन भिवापुर , उमरेड ,नागपुर ग्रामीण, येथे

तसेच नागपुर शहर आणि भंडारा जिल्हयात अवैध रेती चोरीचे अनेक गुन्हे नोंद आहे. आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्याचेवर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपीतांनी त्यांची गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

**भिवापुर पोलीसांनी नमुद ९ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये प्रस्ताव तयार करून मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्फतीने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कडे सादर केला असता मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांच्या कार्यालयाकडुन सदर प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याने सदर गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे.**



**मोहम्मद ईनाजूल उर्फ कल्लू तजमुल खॉन**



कैसर अली रियाजुददीन अली



सुरज दिलीप गभने



**दिनेश मधूकर काकडे**

## पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत गुन्हेगारी मध्ये घट आणि अवैध धंदयावरील कारवाई मध्ये वाढ झाल्याबाबत...

काही वृत्तपत्रात नरखेड तालुक्यात पोलिस निरीक्षकाचा अभाव ,वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभुमीवर पोलीस बल अपुरे अशा शिर्षकाखाली बातमी प्रसिध्द झाली आहे. परंतु जानेवारी ते एप्रील सन २०२५ च्या तुलनेत जानेवारी ते एप्रील सन २०२६ मध्ये नरखेड पोलीस स्टेशन येथे गुन्हेगारी मध्ये घट झालेली असुन अवैध धंदयावरील कारवाई मध्ये वाढ झालेली आहे. विशेष म्हणजे महीलाविरूध्द च्या गुन्हयामध्ये ३० टक्क्यांनी घट झालेली आहे. प्राणांतिक अपघातामध्ये १७ टक्कयांनी घट झाली आहे. घराफोडी च्या गुन्हयामध्ये ७० टक्क्यांनी घट झाली, चोरीच्या गुन्हयांमध्ये ३७ टक्कयांनी घट झालेली असुन इतर शरिराविरूध्द आणि मालमत्तेच्या विरूध्दच्या गुन्हयामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत घट झाली आहे. तसेच अवैध जुगार कारवाई मध्ये ३५ टक्क्यांनी वाढ , अवैध दारू कारवाई ७ टक्कयांनी वाढ, अवैध अंमली पदार्थ कारवाई मध्ये १० टक्क्यांनी वाढ झाली आहे.

जानेवारी ते एप्रील सन २०२६ मध्ये अवैध रेतीच्या कारवाईमध्ये सुध्दा अतुलनिय वाढ झालेली आहे.

नरखेड पोलीसांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहीता कलम १२६ आणि १२९ प्रमाणे १६४ गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. मपोका कलम ५६ प्रमाणे १४ गुन्हेगारांना हद्दपार करण्यात आले असुन मपोका कलम ५७ प्रमाणे ३ गुन्हेगारांना हद्दपार करण्यात आले आहे. महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ९३ अन्वये ०५ गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक करवाई करण्यात आली असुन नरखेड पोलीसांकडुन अवैध धंदयावर सतत कारवाई करण्यात येत आहे.

## अवैधरित्या विनापरवाना देशी/विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ८२ हजार ४६० रूपयांचा मुद्द्देमाल जप्त कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :– दिनांक ०१/०५/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली जात आहे**. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा घोगली येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान टीव्हीएस जुपीटर मोपेड वाहन क्रं एम एच ४० डी डी ३०४३ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी आणि विदेशी दारू मिळुन आली. आरोपी मनोज अशोक तागडे वय ३० वर्ष,रा. घोगली ता. कळमेश्वर,हा अवैधरीत्या देशी आणि विदेशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.

**पोलीसांनी पंचासमक्ष टीव्हीएस जुपीटर मोपेड वाहन क्रं एम एच ४० डी डी ३०४३ आणि एका थैली मध्ये मिळुन आलेलया ०४ नग काचेच्या ९० एमएल विदेशी दारू आणि ५८ नग देशी दारूचे ९० एमएल प्लॉस्टीक बॉटल असा एकुण ८२,४६०/– रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या मोहाफुल गावठी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ८२ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त कुही पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक ०१/०५/२०२६ रोजी कुही पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **अवैधरीत्या माहाफुल दारूची वाहतुक केली जात आहे**. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ वडोदा रोडवर येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान **टीव्हीएस जुपीटर मोपेड वाहन क्रं एम. एच. ४० डी जे २४१८** मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता दोन रबरी टयुब मध्ये मोहाफुल दारू मिळुन आली. आरोपी दुर्गेश विष्णु मारबते, वय २२ वर्ष रा. कोटगांव ता. मौदा जि. नागपुर हा अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.

**पोलीसांनी पंचासमक्ष टीव्हीएस जुपीटर मोपेड वाहन क्रं एम. एच. ४० डी जे २४१८ आणि एका ४० लिटर मोहाफुल दारू असा एकुण ८२,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कुही येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या धारदार शस्त्र बाळगणाऱ्या अरोपीविरूध्द गुन्हा नोंद नरखेड पोलीसांची कामगिरी

**पो.स्टे. नरखेड** :— दिनांक ०१/०५/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, वार्ड क्र ११ नरखेड येथे राहणारा इसम नामे राकेश प्रेमदास अरखेल, रा वार्ड क्र ११ नरखेड,तह नरखेड जि नागपुर हा त्याचे राहते परीसरात लोखंडी कोयता घेवुन फिरत त्यामुळे लोकांच्या मनात भिती निर्माण झाली आहे. मिळालेल्या माहीतीन्वये पोलीसांनी पंचासह नमुद ठिकाणी तात्काळ जावुन पाहणी केली असता **आरोपी नामे राकेश प्रेमदास अरखेल रा वार्ड क्र ११ नरखेड** हा मिळुन आला त्याची झडती घेतली असता याच्या

ताब्यात लोखंडी कोयता हे शस्त्र मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष मिळुन आलेले शस्त्र जप्त केले आहे.

**नमुद आरोपी विरूद्ध पोस्टे नरखेड येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम सह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियमअन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७२६ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०२/०५/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७२६ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण ९७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २५ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १२३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३६ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १२७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १४ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १७ आरोपी अशा एकुण ६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २२ आरोपी अशा एकुण १३८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६८ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४८ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३३ आरोपी अशा एकुण १७८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.



# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २० गुन्हे नोंद

दिनांक ०१/०५/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, विदेशी दारू आणि ३ वाहने असा एकुण **२,८५,८२०/—**रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण २० गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** अंतर्गत ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन काटोल येथे** ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कन्हान** येथे ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे** ०६ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन केळवद येथे ०२** गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन एमआयाडीसी बोरी** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे ०३ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन वेलतुर** येथे ०१ गुन्हा नोंद आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) १०९ लिटर मोहाफुल गावठी दारू २) १५८४० मिली देशी दारू, ९२७० मिली विदेशी दारू आणि तीन दुचाकी वाहने असा एकुण २,८५,८२०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने